**दि मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग सहकारी बँक लि,मुंबई – ०७**

**जाहिरात**

**सरळ सेवा भरती २०१८.**

**भरतीप्रक्रिये बाबत उमेदवारांसाठी सर्व साधारण सूचना**

दि मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग सहकारी बँक लि,मुंबई.०७ या सहकारी बँकेत खाली नमूद केलेल्या संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाने भरण्यासाठी प्रस्तुत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पदांची शैक्षणिक अहर्ता व इतर बाबीची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर ऑन लाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भी वेळा पत्रक**

| | | |
|---|---|---|
| १] | ऑन लाईन पद्धतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक | दि.०९.०१.२०१९ |
| २] | ऑन लाईन पद्धतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि.१८.०१.२०१९ |
| ३] | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या शाखेमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | दि.१८.०१.२०१९ |

**१.पदाचे नांव, पदश्रेणी, पदसंख्या, अहर्ता खालील प्रमाणे.**

**i]पदाचे नांव :- शाखा व्यवस्थापक,एकूण पदे :- ३**

वेतन श्रेणी :- दोन वर्षापर्यंत रु.२०,०००/-मासिक संकलित वेतन मिळेल तद् नंतर बँकेच्या सेवेत कायम झाल्यास पुढील वेतन श्रेणी नुसार वेतन व इतर भत्ते दिले जातील.

वेतन श्रेणी :- ६६००-१७०-७४५०-१८०-८३५०-१९०-९३००-२००-१०३००-२१५-११३७५-२३०-१२५२५

अहर्ता :- बी.कॉम द्वितीय श्रेणी किंवा एम.कॉम तसेच बेसिक संगणक कोर्स आणि सहकारातील उच्च पदवी किंवा जी.डी.सी अँड ए परीक्षा उत्तीर्ण.

अनुभव :- कोणत्याही सहकारी बँकेत किंवा सहकारी संस्थेत अधिकारी पदावर ३ वर्षे काम केल्याचा अनुभव अनिवार्य.

वयो मर्यादा :- वय वर्ष ३५ पेक्षा जास्त नाही

**ii]पदाचे नांव :- लिपिक, एकूण पदे :- १३.**

वेतन श्रेणी :- दोन वर्षापर्यंत रु.१५,०००/-मासिक संकलित वेतन मिळेल तद् नंतर बँकेच्या सेवेत कायम झाल्यास पुढील वेतन श्रेणी नुसार वेतन व इत्तर भत्ते दिले जातील .

वेतन श्रेणी :- ४७००-११०-५२०-१२०-५८५०-१३०-६५००-१४०-७२००-१५०-७९५०-१६०-८७५०

अहर्ता :- कोणताही शाखेचा पदवीधर व बेसिक संगणक कोर्स अनिवार्य.

वयो मर्यादा :- वय वर्ष ३५ पेक्षा जास्त नाही

**iii]**पदाचे नांव :- शिपाई, एकूण पदे :- १०.

वेतन श्रेणी :- दोन वर्षापर्यंत रु.१२,०००/-मासिक संकलित वेतन मिळेल तद् नंतर बँकेच्या सेवेत कायम झाल्यास पुढील वेतन श्रेणी नुसार वेतन व इत्तर भत्ते दिले जातील .

वेतन श्रेणी :- ४०००-८०-४४०-९०-४८५०-१००-५३५०-११०-५९००-१२०-६५००-१३०-७१५०

अहर्ता :-इयत्ता १०वी पास

वयो मर्यादा :- वय वर्ष ४० पेक्षा जास्त नाही

**२.अर्ज,अहर्ता,परीक्षा शुल्क इत्यादी**

1. १.ऑन लाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाही.अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेला दिनांक व वेळेनंतर अर्क स्वीकारले जाणार नाहीत.
2. अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी जाहिरातीचे दिनांकास,ज्या पदासाठी अर्ज केला आहे,त्या पदाच्या आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक अहर्ता,अनुभव व इतर सर्व अहर्ता धारण करणे / अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
3. उपरोक्त पदांसाठी विहित केलेले अर्ज https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दि.०९.०१.२०१९ ते दि.१८.०१.२०१९ पर्यंत उपलब्ध होतील.

**अर्ज शुल्क व परीक्षा शुल्क :-**

१.खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु.७००/- (शाखा व्यवस्थापक व लिपिक)
२.मागास/इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.६००/- (शाखा व्यवस्थापक व लिपिक)
३.शिपाई पदाच्या उमेदवारासाठी अर्ज शुल्क रु.१००/-
४.परीक्षा शुल्क भरल्याबाबतची बँक चलनाची प्रत कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**३.इतर सर्व साधारण अटीं/शर्थी/सूचना :-**

1. पात्रता / आरक्षणंसंदर्भात अर्जामध्ये दावा केलेला असणे आवश्यक आहे.अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपात्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता / आरक्षणाचा दावा ग्राह्य समाजाला जाणार नाही.
2. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.अर्जदाराकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.सदर जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला या मध्ये अर्जदाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.
3. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेची प्रवेशपत्रे,परीक्षेचे वेळापत्रक,बैठक व्यवस्था या वेळोवेळी https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.त्या बाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही.त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत वेळोवेळी संकेत स्थळावरील सूचना पहाव्यात संकेत स्थळावरील सूचना पहिल्या नाहीत या करणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दाखल घेतली जाणार नाही.
4. सदर ऑनलाईन परीक्षा मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मुलाखात परीक्षा घेतली जाईल.
5. जे उमेदवार निवड केले जातील त्यांनी मुलाखतीच्या वेळी आपल्याकडील सर्व ओरिजिनल सर्टिफिकेट,कामाचा अनुभव प्रमाणपत्र ,जात प्रमाणपत्र घेऊन येणे आवश्यक आहे.
6. निवड उमेदवारास मुलाखती साठी बोलावले जाईल ,व त्यासाठी उमेदवाराने उपलब्ध साईट वर वेळोवेळी जाऊन माहिती घेत राहणे.
7. निवड झालेला उमेदवाराचा प्रोबेशन कालावधी २ वर्षाचा असेल.

8. संकलित वेतनाच्या काळात आपली सेवा अथवा आपली वागणूक योग्य नसल्यास आपणास कामावरून कमी करण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.
9. निवड उमेदवारास मुलाखती साठी मुलाखत केंद्रावर स्वखर्चाने येणे.
10. ऑनलाईन परीक्षा झाल्यानंतर मुलाखती साठी निवड यादी संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. मुलाखतीची वेळ व तारीख उमेदवारास संकेत स्थळावरून कळविण्यात येईल.
11. काही कारणास्तव ऑनलाईन परीक्षेची तारीख बदलल्यास ,सदरहू बदल त्याप्रमाणे कळविण्यात येईल.
12. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
13. उमेदवारांने केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल.अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.
14. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व ऑनलाईन परीक्षेच्या वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहित दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास,त्या उमेदवाराची उमेदवारी निवड कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.
15. लिंक बंद होण्या अगोदर चलनाची प्रत डाऊनलोड करून ठेवावी.
16. उमेदवाराचे वय ३१ डिसेंबर २०१८ या तारखेनुसार ग्राह्य धरण्यात येईल.
17. उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वताची ओळख पटविण्यासाठी आवश्यक ती मूळ कागदपत्रे,परीक्षेच्या प्रवेश पत्रा सह सदर करणे आवश्यक आहे.परीक्षेच्या प्रवेश पत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळख पात्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे.ज्या उमेदवाराच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाह नंतर बदल घडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.सदर महिला उमेदवाराने नावात बदल झाल्याबद्दल चे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाण पत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे.परीक्षेचे प्रवेश पत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र या मधील नावात कोणतीही तफावत अधाल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू देणार नाही.

**४.अर्ज भरणे व सादर करणे बाबत आवश्यक सूचना :-**

1. उमेदवाराने अर्ज भरण्यापूर्वी https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर जावून जाहिरात सविस्तर अभ्यासावी.भरावयाची सर्व माहिती उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा.अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जातील.
2. पात्र उमेदवाराला ऑनलाईन अर्ज दि.१८.०१.२०१९ याकालावाधीतच https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर सादर करणे आवश्यक राहील.इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.
3. अर्जात हेतू पुरस्सर खोटी माहिती देणे किंवा त्यात बद्दल करणे,परीक्षा कक्षातील गैर वर्तन,परीक्षेच्या वेळी नक्कल करणे अथवा परीक्षे नंतर ही गैर प्रकार करणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.
4. वय,शैक्षणिक अहर्ता,अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये उल्लेख करणे आवश्यक आहे.अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे उल्लेख केला नसल्यास संबंधित अर्जाचा विचार केला जाणार नाही.उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.
5. गुणांऐवजी श्रेणी पद्धत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

**ऑन लाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

1. प्रोफाईल निर्मित / प्रोफाईल अद्यावत करणे.
2. अर्ज सादरीकरण

3. शुल्क भरणा

**प्रोफाईलनिर्मित / प्रोफाईल अद्यावत करणे.**

1. https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरिता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल.नवीन खाते (वापरकर्त्याचे नांव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.
2. प्रोफाईल माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच ई-मेल आयडी,मोबईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराकडे नित्य वापरत असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.तसेच भरती प्रक्रीयेदरम्यान पत्रव्यवहार,प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑन लाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत रहाणे आवश्यक आहे.
4. वरील प्रमाणे प्रोफाईल निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःच्या Login व Password द्वारे प्रवेश करून प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती,संपर्क तपशील,इतर माहिती,शैक्षणिक अहर्ता,अनुभव इत्यादी संदर्भातील तपशिलाची अचूक नोंद करावी.
5. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-

   नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरून झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र / फोटो (रुंदी.३.५से.मी X उंची ४.५से.मी) व स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करून खालीलप्रमाणे अपलोड करावी.

   १] एक पांढऱ्या स्वच कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा.फोटोवर स्वाक्षरी करून नये .वरील सूचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करू नये.फक्त स्कॅनरवर ठेवून स्कॅन करता येईल.

   २] फोटोच आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे

रुंदी ३.५ से.मी

उंची ४.५ से.मी



३] छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रूपाशी जुळणारे असावे.

४] विहित आकार /क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या पेनाने स्वच कागदावर स्वाक्षरी करावी.

५] उमेदवाराने स्वतःस्वाक्षरी करणे आवश्यक आहे.अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.

६] वरील प्रमाणे विहित आकारातील फोटो व स्वाक्षरी वेळोवेळी स्कॅन करावी.संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करू नये.

७] फोटो व स्वाक्षरी चे प्रत्येकाची संपूर्ण इमेज ची स्कॅन करून JPG फोर्मेट मध्ये संगणकावर वेगवेगळया फाइल्स मध्ये स्वतंत्र पणे जतन (SAVE) करावी.तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी 50 KB पेक्षा जास्त असता कामा नये.यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्वीकारली जात नाही.इमेज ची साईज 50KB पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे DPI RESOLUTION,NO.OF COLOURS etc द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

८] स्कॅनकरून अपलोड केलेली स्वाक्षरी,प्रवेशपत्र/हजेरी पट व तत्सम करण्यासाठी वापरण्यात येईल.परीक्षेच्या वेळी,प्रत्येक कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी किंवा फोटो न जुळल्यास अपात्र ठरविण्यात येईल अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९] नोंदणी व अर्ज करण्याची प्रक्रिया उमेदवारांनी स्वतः करणे आवश्यक आहे.

१०] अर्ज मराठी व इंग्रजी मध्ये उपलब्ध करून देण्यात आला असला तरी संगणक प्रक्रीये करीता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.अर्जाची संपूर्ण माहित (Capital Letter) मध्ये भरावी.संक्षिप्तपणे (Abbservation) व अध्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नांव व संपूर्ण पता नमूद करावा.नावाच्या / पत्याच्या दोन भागानमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

११] एस.एस.सी अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावा प्रमाणे अर्ज भरावेत.त्यांनंतर नांव बदललेले असल्यास अथवा प्रमाण पत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बद्दल झाला असल्यास,त्या संबंधीच्या बदला संदर्भातील राजपत्राची प्रत कागद पत्र पडताळनिच्या वेळी सदर करावी.

१२] पत्र व्यवहाराचा स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र,स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरूपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

१३] संबंधित पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात / अधिसुचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा.अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

१४] वरील कार्यपद्धती ही अर्ज करण्याची योग्य पद्धत आहे.या शिवाय दुसऱ्या पद्धतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

१५] उमेदवाराने अर्जात स्वताचे नांव,सामाजिक प्रवर्ग,कोणत्याही प्रवर्गातून अर्ज करून इच्छित आहे तो प्रवर्ग,जन्म दिनांक,भ्रमणध्वनी क्रं. व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजी पूर्वक भरावी.सदरची माहिती चुकल्यास त्यास केवळ उमेदवार जबाबदार राहील.

१६] उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेश पत्रावर/उपस्थित पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी.तसेच उमेदवाराने ऑन लाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल त्याची दक्षता घ्यावी.

१७] पूर्णतः माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंट ऑऊट काढून घ्यावी.प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी.अर्जाची प्रिंट परीक्षेच्या वेळी तसेच कागदपत्र तपासणीच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

१८] अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाननी शिवाय ऑन लाईन परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे.त्यामुळे उमेदवार ऑन लाईन परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अहर्ता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही.केवळ ऑन लाईन परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटीं अभ्यासूनच अर्ज करावा.

१९] विहित दिनांकानंतर व विहित वेळे नंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

२०] ऑन लाईन प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास ०२२-६१३१६४०३ या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ते रात्री ८.००,शनिवार व रविवार सकाळी.९.३० ते सायंकाळी.६.३० या वेळेत संपर्क साधावा किंवा अर्ज भरण्यासंबंधी,प्रवेश पत्र उपलब्ध होण्यासाठी mr.support@mahaonline.gov.in यावर ई-मेल पाठविल्यानंतर उमेदवारांना त्यांच्या अडचणीचे निराकरण करून उमेदवारांच्या भ्रमणध्वनी वर किंवा ई-मेल आयडीवर संपर्क पाठविण्यात येईल.उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी अचूकपणे बहराने अनिवार्य आहे

२१] उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रं नोंदविणे आवश्यक आहे.तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रं.ऑन लाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत कार्यरत असणे आवश्यक आहे.उमेदवाराने ऑन लाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रं चुकीचा / अपूर्ण असल्यास तसेच भ्रमणध्वनी क्रं.NCPR रजिस्टड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रीये दरम्यान पाठविल्या जाणाऱ्या सूचना,संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी वर संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना दि मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग सहकारी बँक लि,जबाबदार राहणार नाही.प्रवेश पत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल.एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

**अर्ज सादरीकरण :-**

1. https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्यांने स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डद्वारे यशस्वीरीत्या प्रवेश केल्यानंतर "ऑन लाईन अर्ज"येथे क्लिक करावे.जाहिरातीद्वारे प्रसिद्ध केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.
2. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या पदाच्या उजवीकडे असलेल्या"अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा"या ठिकाणी क्लिक करावे.
3. उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल.वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.
4. जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही.असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.अर्ज यशस्वीरीत्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरीत्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.
5. "रक्कम भरा"या पर्यायावर क्लिक करून अर्जदाराला क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड/नेट बँकिंग द्वारे भरणा करता येईल.अथवा अर्जदार ऑन लाईन अर्ज सादर करून भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे,संग्राम केंद्र /सीएससी (नागरिक सेवा केंद्र) येथे चलनाद्वारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारू शकेल.

**शुल्कभरणा :-**

यशस्वीरीत्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता खालील नमूद केलेल्या पद्धतीचा अवलंब करावा.

1. शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्याभागातील "माझे खाते" या लिंकवर क्लिक करावे.
2. " माझे खाते " या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नांव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्यास / न भरल्यास नोंदीसह दिसेल.ज्या पदासमोर "UNPAID"असे लिहिलेले असेल त्या ठिकाणी "PAY NOW"अशी लिंक उपलब्ध असेल.
3. "PAY NOW"या लिंकवर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील.(अ) ऑन लाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे
4. क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड अथवा नेट बँकिंग सहाय्याने ऑन लाईन पेमेंट करता येईल.
5. नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेवून नागरी सुविध केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्कास भरणा केल जाऊ शकतो.सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापुर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.
6. चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास,उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत,बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

7. भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याचा दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.
8. चलनाद्वारे शुल्क स्वीकारण्याकरिता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परीक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारले.अशा प्रकारे उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरताना परीक्षा शुल्क अधिक बँकेचे सेवाशुल्क भरावे लागतील.

**ऑनलाईन परीक्षा :-**

1. जाहिरातीत नमूद करण्यात आलेल्या लिपिक व शाखा व्यवस्थापक या पदासाठी ऑन लाईन परीक्षा वेगवेगळी घेण्यात येईल.
2. परीक्षेसाठी इंग्रजी,सामान्य ज्ञान,अंकगणित/बुद्धिमत्ता चाचणी व विषयज्ञान या विषयावर वस्तूनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील.सदर परीक्षेचा दर्जा हा संबंधित पदाकरिता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अहर्तेनुसार तसेच संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासनीस पूरक राहील.

प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील.प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील.

1. जाहिरातीत नमूद पदाकरीता अर्ज केलेल्या ऑन लाईन परीक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे ऑन लाईन परीक्षेचे प्रवेशपत्र https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर ऑन लाईन परीक्षेच्या किमान ८ (आठ) दिवस अगोदर टाकण्यात येतील(अपलोड करण्यात येतील) उमेदवारांनी संकेतस्थळावरून ऑन लाईन परीक्षा प्रवेशपत्र स्वतः काढून घ्यावे.प्रवेशपत्राद्वारे उमेदवारांना ऑन लाईन परीक्षेचा दिनांक,वेळ व परीक्षा केंद्र या बाबतची माहिती प्राप्त होईल.तसेच उमेदवारांच्या भ्रमणध्वनी वर परीक्षेचा दिनांक व वेळ या बाबत संदेश पाठविण्यात येईल.
2. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे बंधनकारक आहे.त्याशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेस बसण्यास परवानगी मिळणार नाही.परीक्षेनंतर प्रवेशपत्र स्वतः जवळ जपून ठेवावे.
3. काही अपरिहार्य कारणास्तव ऑन लाईन परीक्षेच्या तारखेमध्ये/परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.यावावत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.
4. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्या ठिकाणांमध्ये बदल करण्यासंबंधी केलेल्या विनंतीचा विचार करण्यात येणार नाही.

**ओळख पटवणे :-**

1. परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (PAN CARD)/पारपत्र (PASSPORT) /वाहनचालक परवाना(DRIVING LICENSE)/मतदार ओळखपत्र(VOTER ID)/आधार कार्ड/फोटो साहिताचे पासबुक /कर्मचारी ओळखपत्र/फोटो सहित असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर कराबे आवश्यक आहे.उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेश पत्र /हजेरीपत्र/उपस्थितीपत्र आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटवली जाईल.जर उमेदवाराने ओळख पटवण्याबाबत काही शंक उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.